मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ९५ ■ बुधवार, ०९ जुलै २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# भाजपचे कट्टर माजी नगरसेवक जयंतरावांकडे ?

## तर जयंतरावांचे सेनापती अजितदादांच्या छावणीत ; मतदारांबरोबरच भाजप नेत्यांमध्ये संभ्रम



**सांगली : विशेष प्रतिनिधी**

**सांगली जिल्ह्याच्या राजकारणाला स्थानिक संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर वेगळाच रंग चढला आहे. भाजपचे माजी नगरसेवक जयंतरावांच्या राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत तर जयंतरावांचे कट्टर सेनापती म्हणून ओळखले जाणारे अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत. भाजपचा बालेकिल्ला सम जल्या जाणाऱ्या मिरजेत यावेळी विचित्र राजकारण अनुभवास येत आहे.**

२०१८ च्या महापालिका निवडणुकीत भाजपने तब्बल १२ जागांवर विजय मिळिवला होता परंतु आता ती परिस्थिती राहिलेली नाही. मिरजेतील प्रभाग तीन हा भाजपचा बालेकिल्ला समजला जात होता. प्रभाग तीनमधील चारही वार्डांमध्ये भाजपने गेल्या निवडणुकीत झेंडा फडकवला होता. या प्रभागातून विजयी झालेल्या भाजपच्या माजी नगरसेविका अनिता वनखंडे अजितदादांच्या छावणीत दाखल होण्याच्या मार्गावर आहेत तर शांता जाधव तसेच शिवाजी दुर्वे हे दोन माजी नगरसेवक जयंतराव पाटील यांच्या राष्ट्रवादीत शिरकाव करण्याच्या प्रयत्नात आहेत. गेल्या निवडणुकीत विजयी झालेल्या भाजपच्या नगरसेवकांपैकी तिघेजण अन्य पक्षांच्या वाटेवर आहेत तर एकमेव संदीप आवटी हे भाजपचे माजी नगरसेवक पक्षाबरोबर आहेत. प्रभाग क्रमांक चारमध्ये गेल्या महापालिका निवडणुकीत निरंजन आवटी, पांडुरंग कोरे, अस्मिता सलगर आणि मोहना ठाणेदार हे भाजपचे उमेदवार विजयी झाले होते. या प्रभागांमध्ये मात्र अजितदादा गटाला अथवा जयंतरावांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीला शिरकाव करता आलेला नाही. प्रभाग पाचमध्ये मात्र माजी नगरसेवक द्विधा मनस्थितीत आहेत. जयश्रीताई पाटील यांनी बंड करून काँग्रेसला सोडचिट्टी देवून कमळ हातात घेतले त्यावेळी मिरजेतील जाणकार राजकीय नेत्यांना आश्चर्याचा धक्का बसला होता. माजी नगरसेवक करण जामदार मुंबई पर्यंत गेले पण जयश्रीताई पाटील यांच्या पक्षप्रवेशावेळी मात्र तिथून निघणे गरजेचे आहे असे त्यांना वाटले त्यामुळेच किशोर जामदार यांची नेमकी भूमिका काय? याबाबत मिरजकरांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. भाजपबरोबर गेलो तर भाजप विरोधी मतांना मुकावे लागेल ही भिती त्यांना आहे की आपले राजकीय अस्तित्व टिकवायचे असेल तर चालत्या राजकारणाबरोबर आणि आहे तिथेच राहून राजकारण करायचे असा विचार त्यांच्या डोक्यात असावा का ?असा प्रश्न राजकीय जाणकारांमधून व्यक्त केला जात आहे.

प्रभाग पाच मध्ये काँग्रेसचे संजय मेंढे, त्यांच्या धर्मपत्नी बबीता मेंढे, करण जामदार हे काँग्रेसचे तीन उमेदवार विजयी झाले होते, तर एकसंघ राष्ट्रवादीच्या झेंड्याखाली मालन हुलवान यांनी विजय मिळवला होता. विरोधकांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या प्रभाग पाचमधील संजय मेंढे, बबीता मेंढे, करण जामदार अद्याप योग्य मार्गाचा शोध घेत आहेत तर मालन हुलवान अजितदादांच्या राष्ट्रवादीत जातील असा कयास आहे. प्रभाग पाच मधील काँग्रेसच्या या माजी नगरसेवकांनी जयश्रीताई पाटील यांच्याबरोबर जाणे टाळले खरे पण राष्ट्रवादीबरोबर अंतर्गत मांडवली करून प्रभागाचे वेगळेच राजकारण करण्याचा विचार किशोर जामदार यांच्या डोक्यात असावा असाही अंदाज बांधला जात आहे. प्रभाग सहामधील चारीही जागांवर एकसंघ राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले होते. या प्रभागातून राष्ट्रवादीच्या नर्गिस सय्यद, मैनुद्दीन बागवान, रजिया काजी ,अतहर नायकवडी हे विजयी झाले होते. आता मात्र राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या या प्रभागात राष्ट्रवादीमध्ये पडलेल्या फ ुटीमुळे वेगळेच राजकारण आहे. या प्रभागातील माजी नगरसेवकांना शरद पवार यांच्या यांच्या राष्ट्रवादीत ृठेवण्यात माजी महापौर मोहिनुद्दीन बागवान यांना यश येते की आ.इद्रिस नायकवडी यांच्या नेतृत्वाखालील अजितदादांची राष्ट्रवादी प्रभाग सहामध्ये मुसंडी मारते यावरच या प्रभागाचे भवितव्य अवलंबुन आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादीचे नेतृत्व प्राधान्याने या सहा मध्ये आपले लक्ष ठेवेल. या प्रभागात अल्पसंख्यांकांची मते अधिक असल्यामुळे त्यांना आपल्याकडे खेचण्यात आमदार इद्रीस नायकवडी यांना कितपत यश येते हे भविष्याच्या उदरात दडले आहे. प्रभाग सात हा भाजपचा बालेकिल्ला आहे. या प्रभागातून चारी जागांवर गेल्या महापालिका निवडणूकीत भाजपने विजयाचा झेंडा रोवला होता. या प्रभागातून विजयी झालेल्या आनंदा देवमाने ,संगीता खोत, गायत्री कल्लोळी, गणेश माळी हे सर्वजण भाजपचे आहेत तथापि आनंदा देवमाने यांना भाजपकडून आपल्याकडे खेचण्यात जनसुराज्य पक्षाचे समीरदादा कदम यांना यश आले आहे. यावेळी प्रथमच जनसुराज्य पक्ष मिरजेच्या राजकीय रिंगणात उतरत आहेत. भाजपशी सख्ख्य असल्यामुळे यावेळी जनसुराज्य पक्ष महापालिकेचे दार स्वतः साठी उघडणार याबाबत राजकीय जाणकारदेखील सकारात्मक आहेत. एकंदरीत विचार करता गेल्या निवडणुकीत बारा जागा जिंकणाऱ्या भाजपला यावेळी कितपत यश मिळते याबाबत सांशंकता व्यक्त केली जाते.

मिरजेच्या राजकारणात काहीच स्थिर नसते प्रत्येक नेता आपल्या घरातील किमान दोन तरी नगरसेवक म्हणून महापालिकेच्या सभागृहात पाठवण्यासाठी धडपडत असतो. जयंतराव पाटील यांचा उघड प्रचार नसला तरी त्यांची व्यूहरचना पाहता आणि मिरजेतील राजकारणाची जाणीव लक्षात घेता जयंतराव पाटील काहीतरी वेगळे घडविण्याचा प्रयत्न करतील असा अंदाज राजकीय जाणकारातून व्यक्त होत आहे







## संक्षिप्त...

### राधानगरी धरण ८० टक्के भरले



**राधानगरी : हॅलो प्रभात**

राधानगरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच पाणी सात स्वयंचलित दरवाजाजवळ येऊन पोहोचले असून, धरण ८० टक्के भरले आहे. मे महिन्यातच धरणात भरपूर जलसाठा झाल्याने हे धरण लवकर भरले असून, ही घटना ऐतिहासिक आहे.

### आपत्ती व्यवस्थापनाचे अचूक नियोजन

**सोलापूर : हॅलो प्रभात**

यंदा मे महिन्यापासून सोलापूरसह राज्यात मुसळधार पाऊस झाल्याने पंढरपूरच्या आषाढी वारीवर महापुराचे संकट ओढवले होते,

परंतु जिल्हा महसूल प्रशासनाने आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या आधारे उजनीतून पाणी सोडण्याचा निर्णय घेतल्याने विनाव्यत्यय वारी पार पडली.

टप्प्याटप्प्याने उजनीतून पाणी सोडण्याचे अचूक नियोजन केल्याने चंद्रभागेत लाखों भाविकांनी पवित्र स्नानाचा आनंद लुटला.

## डी.वाय.पाटील अभियांत्रिकीचा टिससाईड युनिव्हर्सिटीशी सामंजस्य करार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कसबा बावडा येथील डी वाय पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाने युनायटेड किंगडममधील टिससाईड युनिव्हर्सिटी, मिडल्सबर्ग सोबत सामंजस्य करार केला आहे. या करारातर्गत अल्पकालीन विद्यार्थी व प्राध्यापक देवाणघेवाण, प्रकल्प सहयोग आणि इंटर्नशिप संधी उपलब्ध होणार असून युके आणि युरोपमध्ये उच्च शिक्षण, संशोधन व औद्योगिक अनुभवाचा नव्या



वाटा खुल्या होणार आहेत.

पुणे येथे झालेल्या या करारासाठी टिससाईड युनिव्हर्सिटी कडून अधिष्ठाता डॉ. केविन व अधिष्ठाता डॉ. व्हिक्टोरिया रुशन यांनी परिश्रम घेतले. डी.वाय. पाटील महाविद्यालयाचे आंतरराष्ट्रीय संबंध प्रमुख डॉ. सनी मोहिते यांनी या कराराचे फायदे, शैक्षणिक व औद्योगिक दृष्टिकोनातून व्यवहार्यता याचे सादरीकरण केले. यावेळी डॉ. कीर्ती महाजन आणि प्रा. गौरी मेहतर उपस्थित होते.

या सामंजस्य करारामुळे कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर शिक्षण व उद्योग क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करण्याची सुवर्णसंधी प्राप्त होणार आहे. डी.वाय.पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय डी.पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, विश्वस्त पृथ्वीराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ.ए.के.गुप्ता, प्राचार्य डॉ. एस.डी.चेडे, कुलसचिव डॉ. एल.व्ही. मालदे यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

## 'गोकुळ'च्या वासरू संगोपनातून

### दुग्ध व्यवसायास नवे बळ : नविद मुश्रीफ

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

दुग्ध व्यवसायाचा पाया बळकट करण्यासाठी गोठा व्यवस्थापन, तंत्रज्ञान आणि स्थानिक स्तरावर पशुधनाची गुणवत्ता या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. 'प्रगत गोठा, समृद्ध गोकुळ' ही या संकल्पनेतून गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ यांनी सुरूपली (ता.कागल) परिसरातील गोकुळ संलग्न प्रगतशील दूध उत्पादक, गोठा भेट कार्यक्रमाअंतर्गत शहाजी पांडुरंग पाटील यांच्या गोठ्याला भेट दिली. यावेळी संघाचे अधिकारी, संस्था प्रतिनिधी, दूध उत्पादक उपस्थित होते.



यावेळी बोलताना गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ म्हणाले, जातिवंत रेड्या-पाड्यांची वाढ आपल्या गोठ्यांमध्येच होणे ही दुग्ध व्यवसायासाठी मोठी गोष्ट आहे.

बाहेरून जनावरे खरेदी करण्याऐवजी आपल्या पशुधनाची गुणवत्ता स्थानिक पातळीवर वाढवणे हे गोकुळचे उद्दिष्ट आहे. तसेच गोठा चांगला असेल, जनावरांची योग्य काळजी, स्वच्छता, योग्य आहार, संगोपन आणि मोकळं वातावरण असेल, तरच जनावरांच्या दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. म्हणूनच, गोकुळकडून 'मुक्त गोठा' हि संकल्पना राबवली जात आहे. यासाठी संघाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'वासरू संगोपन' व 'मुक्त गोठा' या योजनेमध्ये सहभाग घ्यावा व दूध वाढीस हातभार लावावा.

## संशोधकांसाठी समस्या हिच संधी असते : प्रा.डॉ.एन.पी.पाधी

**पुणे : हॅलो प्रभात**

संशोधकांसाठी समस्या हिच संधी असते. त्यातूनच इतिहासात आजवर अनेक मोठे अविष्कार घडले व मानवी जीवन सुकर झाले. प्रतिभावान संशोधक केवळ आयआयटी सारख्या संस्थांमध्ये भेटतात ही संकल्पनाही आता कालबाह्य झाली आहे. कारण, भारताच्या कानाकोपऱ्यात प्रचंड ज्ञान आणि प्रतिभा भरलेले संशोधक समोर येत आहेत ज्यांनी मानवासमोरील जटील समस्यांवर संशोधन करून उपाय शोधले आहेत. त्यामुळे, भारताच्या प्रगतीसाठी सामंजस्य



करार करायला हवेत, असे मत मालवीय राष्ट्रीय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे संचालक (एमएनआयटी) प्रा.डॉ.एन.पी. पाधी यांनी मांडले.

ते एमएनआयटी जयपुर आणि येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांच्यात झालेल्या ऐतिहासिक सामंज्यस्य करार प्रसंगी बोलत होते. यावेळी, एमएनआयटीचे संशोधन व सल्लागार विभागाचे अधिष्ठाता प्रा.डॉ.लव भार्गव, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश तु. कराड, कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.मोहित दुबे, डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, संशोधन संचालक डॉ.विरेंद्र भोजवानी, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ.सुराज भोयार आदी उपस्थित होते.

या कराराच्या माध्यमातून दोन्ही संस्थांमध्ये संयुक्त संशोधन प्रकल्प, विद्यार्थी व प्राध्यापक देवाण-घेवाण आदी उपक्रम राबविण्याचा मार्ग खुला झाला आहे. याप्रसंगी, अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा.डॉ.कराड म्हणाले, दोन्ही संस्थांमधील हा करार ही केवळ औपचारिकता नसून देशाच्या परिवर्तनासाठी सामूहिक ज्ञाननिर्मितीचे एक पाऊल आहे.

विश्वशांती प्रार्थना आणि दीपप्रज्वलनाद्वारे सुरुवात झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.भोयर यांनी केले. तर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताद्वारे करण्यात आली. तर, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.प्रतिभा जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले.

### 'एमआयटी-इन्स्पायर' स्थापना

या कार्यक्रमाप्रसंगी, एमआयटी 'एमआयटी-इन्स्पायर' (एमआयटी-प्रायोजित आणि नाविन्यपूर्ण संशोधन संस्था) या नवनिर्मित संशोधन केंद्राचा शुभारंभ झाला. प्रा.डॉ.मंगेश कराड यांच्या संकल्पनेतून आणि कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस.यांच्या मार्गदर्शनाखाली भारत सरकारच्या विकसित भारत @2047 या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत कार्य करेल.






## मराठी भाषेला प्रथम प्राधान्य देवून ज्वलंत व गंभीर प्रश्नाकडे वळावे!

सध्याच्या परिस्थितीत राजकीय पुढारी मराठी भाषेला प्राधान्य कमी व राजकारणाला जास्त महत्त्व देत असल्याचे राजकीय वतुर्ळात दिसून येते.कारण ज्याला जसे वाटेल तसे राजकीय पुढारी वक्तव्य करतांना स्पष्ट दिसत आहे.यामुळे आपल्याला राजकारणात जास्तीत जास्त फायदा कसा होईल याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.सरकारने अचानक हिंदी सक्तीचा जीआर काढला तेव्हा पासून राज्यात भाषावादाला एक नवीन वळण आल्याचे दिसून आले.सरकारच्या हिंदी सक्तीच्या नादात राज ठाकरे भाजपा पासुन दुरावले व उध्दव ठाकरे यांच्या गोटात जाऊन मिळाले याला कारणीभूत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिक्षण मंत्री भुरे आहेत.आज मराठी-हिंदी भाषा वाद एवढा विकोपाला गेला की शेअर मार्केटमधील केडियोनॉमिक्स कंपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील केडिया यांनी ट्युटमध्ये म्हटले होते की राज ठाकरे हे लक्षात ठेवा, मी गेल्या ३0 वर्षापासून मुंबईत राहत असूनही मला मराठी नीट येत नाही.आता तुमच्या वाईट वागणूकीमुळे मी असा निश्चय केला आहे की मी मराठी शिकणार नाही.मी अशी प्रतिज्ञा करतो.क्या करना है बोल? असे बोलून केडिया ने मराठी भाषेत एक नवीन वाद निर्माण केला व नंतर अंगलट आल्याचे पाहून राज ठाकरेंना माफी सुध्दा मागितली.म्हणजेच ज्या ताटात खायच,त्याच ताटाला छिद्र पाडायचे असे काम केडियाने केले आहे आणि याला कारणीभूत सरकारने काढलेला हिंदी भाषेचा सक्तीचा जीआर आहे.तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी हिंदी सक्तीला नवीन वळण दिले असून गुजरात प्रेम वाढल्याचे दिसून आले. पुण्यातील एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी जय हिंद,जय महाराष्ट्र सोबतच जय गुजरातचाही नारा दिला. कारण त्या कार्यक्रमात अमित शाह उपस्थित होते. यावरून स्पष्ट लक्षात येते मराठी भाषेला विसरून एकनाथराव शिंदे अमित शाह पुढे लोटांगण जात. आहे की काय असे वाटत आहे.कार्यक्रम महाराष्ट्रात आणि 'गुजरातचा जय जय कार ' ही बाब सरकार कशी काय सहन करीत आहे?हा मोठा प्रश्न उपस्थित होतो.कारण एकनाथराव शिंदे एका जबाबदार पदावर विराजमान आहेत.यावरून स्पष्ट होते की राज्यातील काही लोक मुद्दाम मराठी भाषेला डावलून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा प्रयत्न करीत असुन याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत कसा घेता येईल याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष आहे.शिंदे असेही म्हणायचे की शिवसेना मराठी माणसासाठी उभी केली परंतु आता जय गुजरातच्या नाऱ्यामुळे काय म्हणायचे असे वाटते, यालाच म्हणतात 'विनाशकाले विपरीत बुद्धी'.सरकारने व पक्ष-विपक्षांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की भाषेवरून राज्यात कोणत्याही प्रकारची गुंडगिरी व राजकारण नकोच! सर्वांनीच राजकारण बाजूला सारून मराठी भाषेला कसे उंच शिखरावर नेता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.कारण राज्यातील प्रत्येक माणूस मातृभाषेपासून परीपक्व होतो व संपूर्ण विषयांची समज पक्की होते.यामुळे प्रत्येकामध्ये संस्कार,आदानप्रदान, सुसंस्कृतपणा, संस्कृती,जडणघडण, आचारविचार या संपूर्ण बाबी परीपक्व करण्याचे काम संपुर्ण मातृभाषा करीत असते. त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दि.१६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दि. २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून आले होते.परंतु आता सर्वच राजकीय पक्षांनी भाषेला आपले राजकीय अस्त्र-शस्त्र बनविण्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय खेळी म्हणावी लागेल. सरकारला हिंदी सक्तीचा जीआर काढण्याची काय गरज होती ही बाब राज्याच्या जनतेला अजून पर्यंत समजलीच नाही.आपण महाराष्ट्रात राहातो मग अचानक हिंदी भाषेचा लाड सरकारच्या ह्रुदयात कसा काय उफाळून आला! असे अनेक प्रश्न आज मराठी माणसाच्या मनात भेडसावत आहे. यावरून स्पष्ट होते की सरकार मराठी माणसामध्ये फुट पाडण्याचा तर प्रयत्न करत तर नाही ना!असाही प्रश्न निर्माण होतो आहे.

## Nothing सादर करत आहेत फ्लॅगशीप NOTHING PHONE

**मुंबई : हॅलो प्रभात**



Nothing या लंडनस्थित तंत्रज्ञान कंपनीने आज भारतात त्यांची अशी दोन उत्पादने सादर केली ज्यामुळे संबंधित विभागातील मापदंड नव्याने रचले जातील. Nothing Phone (३) हा त्यांचा खऱ्या अर्थाने पहिला फ्लॅगशीप स्मार्टफोन आणि Nothing Headhone(१) हे पहिले ओव्हर इअर ऑडिओ उत्पादन सादर करण्यात आले. विचारपूर्वक डिझाइन आणि वैशिष्ट्यपूर्ण नाविन्यतेसह ग्राहकोपयोगी तंत्रज्ञानाला नवे स्वरूप देण्याचा Nothingचा दृष्टिकोन या दोन्ही उत्पादनांतून प्रतित होत आहे. Nothing Phone (३) मुळे स्मार्टफोनचा परफॉर्मन्स आणि अभिव्यक्तीचे एक नवे पर्व सुरू झाले आहे. तंत्रज्ञान पुन्हा एकदा आपलेसे वाटावे यासाठी खास तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये कमी प्रकाशातही सुंदर फोटो काढता यावेत यासाठी या क्षेत्रातील सर्वोत्तम अशा 1/1.3" मेन सेन्सरसह प्रो ग्रेड ट्रिपल कॅमेरा प्रणाली, लॉसलेस ऑप्टिकल झूम आणि पूर्ण ऑप्टिकल इमेज स्टॅबिलायझेशनसह सर्व लेन्सेसमध्ये सिनेमॅटिक 4K 60fs व्हिडीओची सोय आहे. अल्ट्रा नॅरो बेझल्ससह अत्यंत सुंदर ६.६७' AMOLED डिस्प्ले, दमदार Snadragon® 8s Gen 4 chiset ही सगळी वैशिष्ट्ये प्रीमिअम दर्जाच्या मॉड्युलर डिझाइनमध्ये देण्यात आली आहेत. यातील Glyh Matrix मुळे वापरकर्त्यांना महत्त्वाची माहिती चटकन मिळते शिवाय Fli to Record आणि Glyh Toys सारख्या वैशिष्ट्यांमुळे गुंतवून ठेवणारा खेळकर अनुभव मिळतो. Phone(३) मध्ये नवा ट्राय-कॉलम लेआऊट देण्यात आला आहे. या नव्याने डिझाइन करण्यात आलेल्या R अँगल आकारामुळे अर्गोनॉमिक्सही अधिक चांगले झाले आहेत. फोनच्या पुढच्या बाजूला एकसारख्या १.८७ मिमी. कडा आहेत. त्यामुळे Phone (२) च्या तुलनेत हा फोन १८ टक्के स्लिम किंवा पातळ आहे. तसेच यात अधिक शार्प, सुस्पष्ट आणि गुंतवून ठेवणारा AMOLED स्क्रीनचा अनुभव मिळतो.



# वाघांच्या संख्येत बहार आणणारी 'वाघिण'

**हॅलो प्रभात**

**एकेकाळी लुप्त होणाऱ्या प्राण्यांच्या यादीत असणारा हा वाघ आज मोठ्या संख्येत आहे. वाघांच्या संख्येचे चित्र निदान निदान भारतात तरी आशादायी आहे. या वर्षाच्या सुरूवातीस पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाघांच्या संख्येचे नवीन अंदाज जाहीर केले. त्यांनी वैज्ञानिक आणि वनकार्यकर्त्यांच्या कार्याचे कौतुक करताना म्हंटले, 'बाघो में बहार है..!'**

**हा फेमस डायलॉग कदाचित १९६९ च्या हिट चित्रपट आराधनाचा संदर्भ असावा, त्यातल्या गाण्याचे बोल होते, 'बागों में बहार है.' पण या वाघांच्या संख्येत बहार आणण्यासाठी भारतातल्या एका वाघिणीने प्रयत्न केले होते. 'इंदिरा गांधी' असं त्या वाघिणीचं नाव जिच्यामुळे भारतीय वाघ वाचलाच नाही तर त्यांच्या संख्येत वाढ झाली आणि ९ जुलै १९६९ पासून वाघ हा भारताचा 'राष्ट्रीय प्राणी' घोषित करण्यात आला.**

१९६९ च्या हिवाळ्यात भारताची राजधानी नवी दिल्ली येथे ऐतिहासिक बैठक झाली. बंगालच्या वाघाचे भविष्य ठरवण्यासाठी आययूसीएनच्या (IUCN) दहाव्या महासभेत जगभरातील तज्ज्ञ उपस्थित होते. शिकारी आणि व्यावसायिक सफारी ऑपरेटर्सच्या संयुक्त गटाने विरोध दर्शविला असताना ही, हा निर्णय वाघांच्या बाजूने लागला. वाघ लुप्त होण्याच्या मार्गावर असलेला धोकादायक जीव म्हणून घोषित करण्यात आला. पण तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या निर्णयाने प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावली. जेव्हा वाघांना सर्वात जास्त गरज होती तेव्हा इंदिराजींचा पाठिंबा आला. पण, वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणून स्वीकारण्याचा निर्णय अद्यापही घेण्यात आलेला नव्हता. १६६७ पासून या प्रतिष्ठित स्थानी 'पँथेरा लिओ लिओ' किंवा 'एशियाटिक सिंह' होता.

वाघाला धोकादायक यादीत टाकल्यानंतर, इंदिरा गांधींनी तातडीने भारतातील उर्वरित वाघांना वाचविण्याच्या मोहिमेसाठी पुढाकार घेतला. गांधींनी १९६९ मध्ये वाघांच्या कातडीच्या निर्यातीवर बंदी घातली. १९७१ मध्ये त्यांच्यामार्फत टायगर टास्क फोर्स नेमण्यात आले. पण तोपर्यंत १९ व्या शतकाच्या शेवटी भारतातल्या वाघांची संख्या कमी होऊन केवळ १८०० वर आली होती. त्यावेळचं वाघांच्या या संख्येचं चित्र खूपच भयंकर होते. वाघांच्या टास्क फोर्सने असा अंदाज व्यक्त केला आहे की, २० व्या शतकाच्या शेवटी बंगालमधले वाघ नामशेष होतील.

तातडीची कारवाई करण्याची गरज होती. अशा प्रकारे, दिल्ली उच्च न्यायालयाने वाघांच्या हत्येवर घातलेल्या बंदीच्या रूपाने १९७१ मध्ये आणखी एक ऐतिहासिक निर्णय आला. त्यावेळी बंदी घालण्यात आलेल्या या कायद्यामुळे 'ट्रॉफी हंटिंग इंडस्ट्री'ला याचा तीव्र फटका बसला. वर्षाकाठी तब्बल ४ दशलक्ष डॉलर्सची नुकसान






९ जुलै : जागतिक वाघोबा दिवस

होणार होतं. या कायद्यामुळे वन्यजीवांना अल्प-मुदतीच्या आर्थिक फायद्यांपेक्षा जास्त प्राधान्य दिले गेले होते. वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ संरक्षणाच्या क्षेत्रात आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला. यामुळे भारताच्या वन्य वनस्पती आणि जीवांना व्यापक संरक्षण देण्यात आले. त्याच वर्षी १८ नोव्हेंबर हा एक अविस्मरणीय दिवस उजाडला जेव्हा भारतीय वन्यजीव मंडळाने करिश्माई बंगालच्या वाघाला भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणून स्वीकारले.

प्रजातींना नामशेष होण्यापासून वाचवण्यासाठी मोठी मोहीम देखील जाहीर करण्यात आली होती. त्या वेळी पर्यटनमंत्री प्रिन्स करण सिंह यांनी नमूद केल्यानुसार या वन्यजीव वाचवण्याच्या मोहिमेत भारतीय अर्थव्यवस्थेला ६.७ दशलक्ष डॉलर्सची किंमत मोजावी लागणार होती. त्यानंतर १९७३ मध्ये इंदिरा गांधींनी अजून एक निर्णय घेतला ज्यामुळे वाघांच्या संख्येत वाढ होण्याची चिन्ह निर्माण झाली होती. व्याघ्र प्रकल्प किंवा मग 'प्रोजेक्ट टायगर'.

### इंदिराजींच्या हत्येवेळी तब्बल ४,००० वाघांना घर मिळाले

जगातील सर्वांत व्यापक आणि मोठा व्याघ्र संवर्धन उपक्रम याद्वारे सुरू करण्यात आला. याअंतर्गत नऊ व्याघ्र प्रकल्प इंट्रोड्यूस केले गेले. या प्रकल्पांवर संरक्षणासाठी पहारेकरी नेमले गेले. अशा प्रकल्पांच्या हद्दीत राहणाऱ्या लोकांना विस्थापित करण्यात आले. या सर्व प्रयत्नांमुळे वाघांची संख्या वाढली. पण ज्या वाघिणीने वाघांच्या वाढीसाठी निर्णय घेतला त्या वाघिणीची म्हणजेच १९८४ मध्ये इंदिरा गांधींची दुर्दैवी हत्या झाली आणि या हत्येच्यावेळी भारतात तब्बल ४,००० वाघांना घर मिळाले होते. एव्हाना 'वन्यजीव संवर्धनाचे हे मॉडेल जागतिक मॉडेल' बनले होते.

### वाघ भारताचा राष्ट्रीय प्राणी कधीपासून?

राष्ट्रीय वन्यजीव मंडळाने ९ जुलै १९६९ रोजी म्हणजे आजच्या दिवशी सिंहाला देशाचा राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित केले. त्यानंतर १९७३ साली सिंहाच्या जागी वाघाला राष्ट्रीय प्राणी म्हणून स्थान देण्यात आले. त्यामुळे सिंहाऐवजी आता वाघ हा देशाचा राष्ट्रीय प्राणी म्हणून ओळखला जातो. परंतु कोणत्याही प्राण्याला राष्ट्रीय प्राणी म्हणून घोषित करण्यामागे काय मापदंड असतात? ते जाणून घेऊया.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९७२ मध्ये पहिल्यांदाच आजच्या दिवशी म्हणजे ९ जुलै रोजी भारताचा राष्ट्रीय प्राणी सिंहाची जागा रॉयल बंगाल टायगरने घेतली होती. त्यामुळे वाघ हाच भारताचा राष्ट्रीय प्राणी मानला जाऊ लागला. यावर २०२१५ मध्ये झारखंड राज्यसभेचे खासदार परिमाल नाथवानी यांनी वाघाऐवजी सिंहाला राष्ट्रीय प्राण्याचा दर्जा या मागणीसाठी राष्ट्रीय वन्यजीव




## सिंहाऐवजी वाघाला का देण्यात आला राष्ट्रीय प्राण्याचा दर्जा?

डॉ. फैजाज खुदसर यांनी दिली.

वाचवण्यासाठीचा महत्त्वपूर्ण होता.


### भारतात मांजरी प्रजातीच्या एकूण ३६ पेक्षा जास्त प्रजाती

भारत आणि आशियामध्ये फक्त बंगाल वाघ आढळतात. भारतात मांजरींच्या ३६ पेक्षा जास्त प्रजाती आहेत. त्यांच्यातील सर्वात मोठी मांजर म्हणजे वाघ (टायगर). भारतात बंगालचे वाघ सिंहापेक्षा मोठे आहेत आणि त्यांच्या विशेष गुणांमुळे त्यांना जंगलचा राजा म्हटले जाते. बंगाल टायगर सिंहाप्रमाणे कळपात न राहता एकटे राहणे पसंत करतो. ते नेहमी मोकळेपणाने फिरत शिकार करतो. दरम्यान, भारतात एकेकाळी राजांकडून वाघांची शिकार होऊ लागली. ही शिकार एक गौरवाची बाब मानली जायची. यामुळे भारतातील वाघांची संख्या कमी होऊ लागली.

त्यानंतर 'टायगर प्रोजेक्ट' म्हणजेच 'व्याघ्र प्रकल्पा'ला सुरुवात झाली. या प्रकल्पातून भारतातील वाघांचे जतन व संवर्धनासाठी काम सुरु करण्यात आले.

## टाटा मोटर्सने नवीन हॅरियर इव्हीचे उत्पादन सुरू केले

**मुंबई : हॅलो प्रभात**



भारतातील इलेक्ट्रिक वाहन क्रांतीचे अग्रणी आणि देशातील आघाडीचे एसयूव्ही उत्पादक टाटा मोटर्सने आज हॅरियर.इव्ही या भारतातील अत्यंत दमदार, सक्षम आणि आजवरच्या सर्वात बुद्धिमान अशा एसयूव्हीचे उत्पादन सुरू केले. हॅरियर.इव्हीने आज टाटा मोटर्सच्या पुणे येथील अत्याधुनिक सुविधेच्या प्रॉडक्शन लाइनमधून धमाकेदार पदार्पण केले. बाजारपेठेचा उदंड प्रतिसाद आणि मोठ्या प्रमाणातील बुकिंगचे पाठबळ असलेली हॅरियर.इव्ही आता देशभरातील डीलर्सकडे पोहोचण्यास सज्ज आहे आणि जुलै २०२५ मध्ये डिलिव्हरी सुरू होणार आहे.

## महिलांना सक्षम बनविण्यासाठीचा देबाब्रता ऑरो फाउंडेशनचा उपक्रम

**मुंबई : हॅलो प्रभात**

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी देबाब्रता ऑरो फाउंडेशन आणि एम. तरुण डायमंड्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'वुमन ओन विंग्स' (वॉव) प्रकल्प राबवण्यात आला. गोरेगाव येथील आरे कॉलनीमध्ये दोन महिन्यांच्या शिवणयंत्र प्रशिक्षणाद्वारे महिलांना शिवणकामाचे (टेलरिंगचे) प्राथमिक आणि ॲडव्हान्स प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात सरळ, झिगझॅग टाके, डिझाइनिंग, कपडे जोडणे, बोडीस, बाही आणि शेवटी सलवार-कुर्तीसारखे पूर्ण कपडे तयार करण्याचे कौशल्य शिकवण्यात आले.

## द बॉडी शॉपकडून शिया रेंज सादर

**मुंबई : हॅलो प्रभात**




या सीझनमध्ये द बॉडी शॉपने आपली नवीन आणि लिमिटेड एडिशन रेंज सादर केली आहे. या रेंजमध्ये शिया अँड गोल्डनबेरी रेंज, शिया अँड सॅफ्रॉन रेंज आणि शिया अँड प्लम रेंज यांचा समावेश आहे. ही उत्पादने अद्वितीय, सुगंधित, लिमिटेड एडिशन असल्याने मर्यादित कालावधीकरिता उपलब्ध असतील. लिमिटेड एडिशन शिया अँड गोल्डनबेरी रेंज ५०० रूपयांपासून सुरू होते. यात शिया अँड गोल्डनबेरी बॉडी बटर आणि शिया अँड गोल्डनबेरी हँड बाम ही उत्पादने उपलब्ध आहेत.

## 'टोयोटा'ने अर्बन क्रूझर हायरायडरसाठी खास 'प्रेस्टीज पॅकेज' केले सादर

**बेंगळुरू : वृत्तसेवा**



ग्राहकांचा आनंद वाढवण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधोरेखित करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने त्यांच्या लोकप्रिय सेल्फ-चार्जिंग हायब्रीड एसयूव्ही - अर्बन क्रूझर हायरायडरसाठी एक मर्यादित कालावधीसाठी 'प्रेस्टीज पॅकेज' सादर केले आहे.

एसयूव्हीचे डिझाईन अधिक बोल्ड आणि आकर्षक बनवण्यासाठी हे ॲक्सेसरी पॅकेज तयार करण्यात आले असून, यामुळे रोजच्या ड्रायव्हिंगसाठी स्टाईल, उपस्थिती आणि कार्यक्षमतेत भर पडेल.

जुलै २०२५ पासून उपलब्ध असलेले प्रेस्टीज पॅकेज, हायरायडरच्या आकर्षक आणि आधुनिक डिझाइनला पूरक ठरणारी १० उच्च-मूल्याची, अधिकृत डीलरकडून बसवण्यात येणारी आणि दर्जेदार ॲक्सेसरीजचा समावेश होतो प्रत्येक ॲक्सेसरीची निवड अर्बन क्रूझर हायरायडरच्या वेगळ्या आणि

बोल्ड एसयूव्ही लूकशी सुसंगत राहील यासाठी काळजीपूर्वक करण्यात आली आहे. या ॲक्सेसरीजमुळे वाहनाचा दमदार आकार, क्रोम फिनिशिंग आणि आकर्षक रूपरेषा अधिक उठून दिसते, तसेच अतिरिक्त संरक्षण आणि टिकाऊपणा देखील देते. अर्बन क्रूझर हायरायडर हे या सेगमेंटमधील पहिलेच एसयूव्ही आहे, ज्यामध्ये सेल्फ-चार्जिंग स्ट्राँग हायब्रीड इलेक्ट्रिक पॉवरट्रेन आहे,

निओ ड्राईव्ह (माइल्ड-हायब्रीड) व्हेरियंटमध्ये १.५ लिटर के-सिरीज इंजिन असून - ५-स्पीड मॅन्युअल किंवा ६-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशनचा पर्याय आहे.

अधिक क्षमतेसाठी, काही ट्रिम्समध्ये इंटेलिजंट ऑल-व्हील ड्राईव्ह (एडब्ल्यूडी) सिस्टिम देखील देण्यात आली आहे, जी हायरायडरला कार्यक्षमतेसोबतच अधिक बहुपर्यायी बनवते.

## आचार्य सतविंदर यांच्या संवादात्मक टॉक शोचे आयोजन

**मुंबइ : हॅलो प्रभात**

प्रसिद्ध ज्योतिष आणि अध्यात्मिक मार्गदर्शक आचार्य सतविंदर यांचा एक विशेष संवादात्मक टॉक शो विस्डम, लीडरशिप अँड इन्स्पिरेशन या शीर्षकाखाली येत्या १२ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता, दुबईमधील दुसित थानी हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम दुबईस्थित डीआयबी इव्हेंट्सतर्फे आयोजित केला जात असून, राजकीय, सामाजिक आणि माध्यम क्षेत्रातील नामवंत व्यक्तिमत्वे यामध्ये सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात आचार्य सतविंदर आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून ज्योतिषशास्त्र, जीवनमार्ग आणि नेतृत्व




याविषयी विचार मांडणार आहेत. त्यांच्या मते, ज्योतिष हे अंधश्रद्धेवर आधारित नसून एक वैज्ञानिक शास्त्र आहे जे खगोलीय गतिशास्त्रावर आधारित आहे.

कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या मान्यवरांमध्ये डॉ. बु अब्दुल्ला, डॉ. ओमार अल मारजुकी (दुबई पोलीस अधिकारी), अहमद सालेह, याकूब अल अली, प्रख्यात अध्यात्मिक गुरु प्रदीप 'बाबा' माधोक, उद्योजिका श्रेया, पत्रकार सिमरनजोत सिंग, सामाजिक कार्यकर्ते अमरप्रीत सिंग व गायिका सोनिया माजीद यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे संवादात्मक स्वरूप - उपस्थितांना थेट प्रश्न विचारण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाच्या माध्यमातून 'आत्म्याचा आवाज (अंतरआत्मा की आवाज)' आणि 'सत्याचा मार्ग (सच दा राह)' यासारख्या तत्त्वज्ञानावर चर्चा होईल. आचार्य सतविंदर हे पंजाबमध्ये जन्मलेले असून त्यांनी आधुनिक सिख ज्योतिषशास्त्रात १५ वर्षांहून अधिक संशोधन केलं आहे.

त्यांचे युट्युबवरील विचार आणि वेबसिनार्स जगभरातील लाखो तरुणांना प्रेरित करत आहेत.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

हॅलो प्रभात

MY DISTRICT 

बुधवार, ०९ जुलै २०२५

## बालदिंडीचे ग्रामस्थांकडून कौतुक

**पिलीव : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जि प अंतर्गत पन्हाळा पं. स. मधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विद्यामंदिर सावर्डे येथील विद्यार्थ्यांची मुख्याध्यापक सुरेश गोरडे आणि व्यवस्थापन समितीच्या व ग्रामस्थांच्या सहकार्यातून आषाढी एकादशीचे औचित्य साधून बाल बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या बालदिंडीची सुरुवात विद्यामंदिरापासून करण्यात आली गावागावांमध्ये ही दिंडी ज्ञानोबा तुकारामाच्या जयघोषात टाळ मृदुंगाच्या गजरात भक्तीमय वातावरण करीत या दिंडीचा प्रवास केला. दिंडीचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

# शहरातील मच्छी मार्केट पूर्व जागेवर हलवा

### सुजित थोरात

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

इस्लामपूर शहरातील मच्छी मार्केट पूर्व जागेवर त्वरित हलवावे ही मागणी इस्लामपूर महाडीक युवाशक्तीच्या वतीने करण्यात आली.यावेळी मच्छी व्यापारी आणि युवाशक्तीचे अध्यक्ष सुजित थोरात यांनी मार्केटची सर्व परिस्थिती समजावून सांगितली.शहरात गेली अनेक वर्षे मटन व मच्छी मार्केट एकत्रपणे सुरु होते.ते काही वर्षांपूर्वी नुतनीकरणच्या कारणामुळे पूर्व जागेतून हलवून समोरील मोकळ्या जागेत स्थलांतरित केले आहे. तरी सध्याची पावसाची स्थिती पाहता जवळपास ४० ते ५० व्यापारी अतिशय वाईट परिस्थितीत तेथे व्यापार करीत आहेत.त्या जागेत मासे ठेवण्यासाठी,मासे तोडण्यासाठी किंवा धुण्यासाठी स्वच्छ पाणी अशी कोणतीही सुविधा उपलब्ध नाही.येणाऱ्या ग्राहकाला चिखलाचा,उन,वारा व पावसाचा सामना



करावा लागत आहे.तसेच मच्छी मार्केट उघड्यावर असल्यामुळे सभोवतालच्या परिसरात अतिशय दुर्गंधीचे वातावरण पसरले आहे.तसेच त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा वावर त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात झाला आहे.ती भटकी कुत्री माणसाची जात किंवा लहान बारका म्हणून चावत नाहीत तर ती हिंसक होत आहेत.या मच्छी मार्केट मध्ये रोज लाखो रुपयाची उलाढाल होत असते पण आज पर्यंत प्रशासकाना याची दखल घ्यावी किंवा त्यांना भौतिक सुविधा द्याव्यात याची गरज वाटली नाही.

परंतु रोजच्या रोज त्यांच्याकडून नगरपालिका कर वसूल करते.माझी त्यांना विनंती आहे की लवकरात लवकर या व्यापाऱ्यांना कसा न्याय देता येईल याकडे लक्ष द्यावे.

अन्यथा नगरपालिकेच्या भविष्यात मच्छी मार्केट नगरपालिका दालनासमोर भरवले जाईल.असे निवेदन महाडीक युवाशक्तीच्या वतीने नगरपालिकेला देण्यात आले.यावेळी महाडीक युवा शक्तीचे धीरज कबूरे,सतीश पवार,व्यापारी भगवान गुजर,रामचंद्र देवकुळे,गणेश कांबळे,सुरजकांबळे,अविनाश कोळी,सागर कोळी,आनंदा कांबळे आदि उपस्थित होते.

# दुधगावमध्ये मोठ्या उत्साहात मोहरमची सांगता

**दुधगाव : हॅलो प्रभात**

हसन - हुसेन यांनी सत्यासाठी व अन्यायाविरोधात दिलेल्या बलिदानाचे प्रतीक म्हणून सर्वत्र पीर, ताबूत, पंजे बसविले जातात. दुधगाव मध्येही ऐतिहासिक मोहरम साजरा होतो. गावातील सर्वधर्मीय लोक एकत्र येवून परंपरागत कुदळ मारणे धार्मिक विधी करून मशीद, सुतार दर्गा व हजरत ख्वाजा हैदरसो दर्गा अशा तीन ठिकाणी पीर बसविले.



मोहरम मध्ये संबंधित ठिकाणी विद्युत रोषणाई केली होती. मोहरमचा मुख्य दिवस म्हणजे खत्तलरात्र. यादिवशी गावातील लोक नैवेद्य घेऊन दर्शनासाठी मोठ्या संख्येने आले होते. खत्तलरात्री सर्व पीर एकत्र येऊन भेटी देतात व आपापल्या ठिकाणी परत गेल्या.मशिदितील मानाची मिरची सवारी, सुतार दर्गा, हजरत ख्वाजा हैदरसो दर्गा येथील पीर भक्तांच्या भेटीसाठी गावामध्ये जाते.

रविवारी दप्पन दिवशी गावातील सर्व पीर एकत्र येवून भेटी घेतात. दप्पन दिवशी मुख्य चौकामध्ये सायंकाळी ढोल ताशांच्या गजरात , अबिरांच्या उधळणीत, पारंपरिक खेळ करत देवाचा पालखी मार्गातून विसर्जन मिरवणूक निघाली. यावेळी पंचक्रोशीतील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. मोहरमवेळी दुधगावातील सर्व धर्मीय लोकांनी एकत्र येऊन धार्मिक रूढी परंपरेचे पालन करून, संवेदनशीलतेचा, बंधूभावाचा आणि सामुदायिकतेचा एक दीपस्तंभ या सोहळ्यात अनुभवला. या सोहळ्यात शांतता, ऐक्य आणि श्रद्धा हीच खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीची ओळख आहे याचीही प्रचितीही दाखवली.

दुधगावचा मोहरम हा फक्त गावासाठी नव्हे संपूर्ण समाजासाठी एक प्रेरणास्थान आहे. एकतेच्या पायावर उभी असलेली श्रद्धेची सुंदर शृंगारिक प्रतिमा आहे.दुधगावचा ऐतिहासिक मोहरम म्हणजे श्रद्धेचा, सलोख्याचा आणि संस्कृतीचा लोभस सोहळा संपन्न झाला.

# जिओब्लॅकरॉकची दमदार एन्ट्री

### पहिल्याच NFO मध्ये उभारले १७,८०० कोटी रुपये

**पुणे : हॅलो प्रभात**

जिओब्लॅकरॉक ॲसेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड (जिओब्लॅकरॉक ॲसेट मॅनेजमेंट) या कंपनीने आपल्या पहिल्याच न्यू फंड ऑफर मध्ये तब्बल १७,८०० कोटी रुपये एवढा गुंतवणूक निधी उभारला आहे.

कंपनीने सादर केलेल्या तीन कॅश/डेट म्युच्युअल फंडांमध्ये- जिओब्लॅकरॉक ओव्हरनाईट फंड, जिओब्लॅकरॉक लिक्विड फंड आणि जिओब्लॅकरॉक मनी मार्केट फंड, यामध्ये ९० हून अधिक संस्थात्मक गुंतवणूकदार तसेच ६७,००० पेक्षा जास्त वैयक्तिक गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली.जिओब्लॅकरॉक ॲसेट मॅनेजमेंट ही कंपनी जिओ फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड आणि ब्लॅकरॉक इंक यांच्यातील संयुक्त उद्यम आहे. या फंडाचा प्रारंभ ३० जून २०२५ रोजी झाला होता आणि ०२ जुलै २०२५ रोजी संपला. भारतातील कॅश/डेट फंड क्षेत्रातला हा आतापर्यंतचा सर्वात मोठा NFO ठरला असून, यामुळे जिओब्लॅकरॉक देशातील ४७ म्युच्युअल फंड हाउसेसपैकी टॉप १५ ॲसेट मॅनेजमेंट कंपन्यांमध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी ठरला आहे.

जिओब्लॅकरॉक ॲसेट मॅनेजमेंटचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सिड स्वामीनाथन म्हणाले, संस्थात्मक तसेच किरकोळ गुंतवणूकदारांनी आमच्या पहिल्याच NFO ला मिळवून दिलेला जोरदार प्रतिसाद हा आमच्या गुंतवणूक तत्वज्ञान, जोखमीचे व्यवस्थापन आणि डिजिटल-फर्स्ट दृष्टीकोनावर विश्वास दाखवतो. भारतातील विकसित होत चाललेल्या गुंतवणूक क्षेत्रात प्रभावी भूमिका बजावण्यासाठी हा आमच्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

# बाल वारकऱ्यांनी सजवली विठ्ठलनामाची दिंडी

### ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषात गाव निनादलं

**येळावी : हॅलो प्रभात**

येथील किड्स टॅलेंट स्कूल च्या वतीने शनिवारी आषाढी एकादशी वारी निमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जय हरी विठ्ठल, तुकारामांच्या भजनामध्ये दंग असलेल्या बालवारकऱ्यांनी मोठ्या उत्साहात दिंडी साजरी केली. सदर दिंडीत डोक्यावर पांढरी टोपी, पायजमा, बंडी,



धोतर या पोशाखात मुले तर रंगबिरंगी साड्या परिधान करून डोक्यावर तुळस घेऊन मुली सहभागी झाल्या. हातात भगवे ध्वज, टाळ-मृदंगाचा निनाद त्याला वीणाची साथ, ज्ञानोबा, तुकोबा आणि विठोबा रुख्मीनीचा जयघोष करीत गावातून निघालेल्या दिंडीने गावकऱ्यांचे लक्ष वेधले. दरम्यान,टाळ मृदंगाच्या निनादात ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष करत पालखीसह गावातून मोठी फेरी काढत ग्रामस्थांना भक्तीचा संदेश दिला. चिमुकल्या वारकऱ्यांची दिंडी पाहण्याकरता ग्रामस्थांनी गर्दी केल्याचं दिसून आली.वारीचे नियोजन चांगल्या पद्धतीने झाल्याने पालकां बरोबर ग्रामस्थांनी किड्स टॅलेंट स्कूल च्या मुख्याध्यापिका पठाण मॅडम तसेच शिक्षक स्टाफ चे कौतुक केले.

# आषाढी रिंगण सोहळा अभूतपूर्व ऊर्जा व ज्ञान देणारा : डॉ.दत्तात्रय घुगरे

### आदर्श गुरुकुलात रंगला चैतन्यमय रिंगण सोहळा

**पेठवडगांव : हॅलो प्रभात**

येथील आदर्श गुरुकुल शिक्षण संस्थेतील आदर्श गुरुकुल विद्यालय व ज्युनि. कॉलेज ग्रीन व्हॅली पब्लिक स्कूल, गुरुकुल प्राथमिक विद्यालय, ग्रीन व्हॅली प्रायमरी स्कूल येथे भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशी निमित्त रंगला चैतन्यमय रिंगण व विचार दिंडी सोहळा.यावेळी संत ज्ञानेश्वर माऊलींची पालखी,ग्रंथ दिंडी विचार दिडीचे संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष डॉ.दत्तात्रय घुगरे व मुख्याध्यापिका तथा सचिवा सौ. महानंदा घुगरे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले.यावेळी श्री. घुगरे म्हणाले की हा भक्तिमय आषाढी दिंडी व रिंगण सोहळा विद्यार्थ्यांना आपल्या सर्वांना अभूतपूर्व ऊर्जा व ज्ञान देणारा सोहळा आहे. आषाढी दिंडी सोहळ्यामध्ये लाखो करोडो भाविक भक्तिभावाने एकत्र येतात. विठ्ठलाचे नामस्मरण करतात आणि आयुष्यासाठी अभूतपूर्व ऊर्जा मिळवतात त्याच पद्धतीने आज आदर्श गुरुकुल शिक्षण संस्थेमध्ये अनुभूती प्रत्येकाला आली असेल. वृक्षदिंडी, ग्रंथदिंडी,शेतकरी दिंडी, विचारवंत,महापुरुष,शास्त्रज्ञ



यांचे संदेश देणारी विचार दिंडीतून आपल्याला ज्ञान संपादन होईल.

सचिव सौ.महानंदा घुगरे म्हणाले की, महाराष्ट्राच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसाचे दर्शन घडवणारे वारकरी संप्रदायाचे भक्ती उत्साहाचा मेळा म्हणजे वारकरी पायीदिंडी व रिंगण सोहळ्याचा नेत्रदीप भक्तीसागराची अनुभूती आदर्श गुरुकुल विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी घेतली.यावेळी शाळेच्या प्रांगणामध्ये स्वामी विवेकानंद मंदिराच्या समोरून टाळकरी,तुळसी वृंदावन धारक विद्यार्थिनी, वारकरी, झेंडेकरी, मृदुंग वादक,वीणेकरी, हातात भगव्या पताका तसेच विविध संतांची वेशभूषा परिधान केलेल्या जवळपास अडीच हजार विद्यार्थी सहभागातून विठुरायाच्या नामस्मरण करीत चैतन्यमय रिंगण व विचार दिंडी शाळेच्या परिसरातून फिरत प्रांगणात आली. प्रांगणामध्ये शोभनीय असे रांगोळी व आखणी करून रिंगण केले होते त्या रिंगणामध्ये दिंडी आली. रिंगणाच्या मध्यभागी आकर्षक अशी प्रसन्न विठुरायांची मूर्ती होती त्या भोवती वारकरी, टाळकरी, झेंडेकरी यांनी रिंगण घालण्यात आले. यावेळी झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात अभंग,भारुडे, कीर्तने,भक्ती गीते सादर केली.

संस्थापक अध्यक्ष डॉ. डी एस घुगरे, सचिव तथा मुख्याध्यापिका सौ एम डी घुगरे, ग्रीन व्हॅली चे मुख्याध्यापक व्ही. एस. डोईजड, पर्यवेक्षक एस जी जाधव, प्रशासक एस.ए.पाटील,एस.एस. गिरीगोसावी,एम एच.चौगुले आदी. मान्यवर उपस्थित होते.

## संमिश्र

## आ.रोहित पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर



**येळावी : शुभम पाटील**

नेहरूनगर येथे तासगांव कवठेमंहाकाळ मतदार संघाचे आमदार रोहित पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरास युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत ८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तसंकलन अक्षय ब्लड बँक, मिरज यांनी केले.रक्तदान शिबिर ग्रामपंचायत नेहरूनगर यांच्या तर्फे आयोजित करण्यात आले असून गेले ३ वर्षे अशा प्रकारच्या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.उद्घाटन प्रसंगी जेष्ठ नेते मस्के बापू, राष्ट्रवादी शरचंद्र पवार गट अध्यक्ष विश्वास तात्या पाटील, सरपंच ऋतुजाताई जाधव, उपसरपंच अविनाश पाटील, ,विलास पाटील, विलास पाटील, जालिंदर मस्के, रामदास जाधव, विजय कोळी, चंद्रकांत लोंढे यांसोबत गावातील ग्रामस्थ व तरुण उपस्थित होते.

## कुंभी कारखान्यास उच्च उतारा पुरस्कार प्रदान




**करवीर : हॅलो प्रभात**

कुंभी-कासारी सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज या संस्थेकडून सर्वाधिक उच्च साखर उतारा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी व केंद्रीय राज्यमंत्री निमूबेन भामनिया, माजी केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू नॅशनल फेडरेशनचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते, कारखान्याचे उपाध्यक्ष राहुल खाडे,संचालक उत्तम वरुटे, कार्यकारी संचालक धीरजकुमार माने यांनी नॅशनल फेडरेशन को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज, न्यू दिल्ली यांचा उच्च साखर उतारासाठीचा प्रथम पुरस्कार प्रल्हाद जोशी, निमूबेन भामनिया, सुरेश प्रभू, हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते राहुल खाडे,उत्तम वरुटे, धीरजकुमार माने यांनी स्वीकारला. पुरस्कार स्वीकारला. दिल्लीतील डॉ.आंबेडकर सेंटरमध्ये हा कार्यक्रम झाला.कारखान्याने हंगाम २०२३-२४ मध्ये ६ लाख ९७ हजार मे. टन गळीत करुन ८ लाख ९६ हजार ९५० क्विंटल साखर पोत्यांचे उत्पादन केले आहे.

## माध्यमिक विद्यालय घोटवडे येथे विद्यार्थी निवडणुका संपन्न



**कोतोली : हॅलो प्रभात**

घोटवडे (ता.पन्हाळा) माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज घोटवडे येथे लोकशाही पद्धतीने विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणुका उत्साहात पार पडल्या. या निवडणुकांमुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही प्रक्रिया आणि नेतृत्वगुणांची जाणीव निर्माण झाली.निवडणुकीचे नियोजन विद्यालयाचे शिक्षक श्री. गोविंद लव्हटे आणि मुख्याध्यापिका सौ. सुनिता सुरेश पाटील यांनी केले. पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या निवडणुकीत विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून देवकी पाटील तर विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून प्रमोद पाटील यांची निवड झाली.

या निवडणूक प्रक्रियेत सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व विकास, सहभाग आणि जबाबदारी यांचे मूल्य रुजवण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरल्याचे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

## सिद्धी विभुतेचे नेमबाजी स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

देहरादून (उत्तराखंड) येथे १ जुलै ते १० जुलै २०२५ दरम्यान पार पडलेल्या ०१३५ इंडिया ओपन कॉम्प्युटिशन छठ इव्हेंट्स मध्ये कोल्हापूरच्या कु. सिद्धी शरद विभुते (वय १७) हिने २५ मीटर स्टँडर्ड पिस्तूल या प्रकारात ज्युनियर गटात रौप्य पदक पटकावत राज्याचे नाव उज्वल केले आहे.सिद्धी सध्या आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेते आणि निष्णात नेमबाज व प्रशिक्षक जितेंद्र विभुते यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर येथील क्रीडा संकुलात प्रशिक्षण घेत आहे. तिला लक्ष्यवेध रायफल व पिस्तुल क्लब चेही मार्गदर्शन लाभत आहे.या यशाआधीही सिद्धीने जिल्हा, राज्य आणि अंतरराज्य स्तरावर विविध स्पर्धांमध्ये सिल्व्हर व गोल्ड मेडल पटकावले आहेत. ग्रामीण भागातून राष्ट्रीय पातळीवर झेप घेत तिने दाखवलेले हे यश निश्चितच प्रेरणादायक आहे. सध्या ती विद्यापीठ हायस्कूलची विद्यार्थिनी असून शिवाजी विद्यापीठ अंतर्गत स्पोर्ट्स ग्रॅज्युएशनचे शिक्षण घेत आहे. तिच्याकडून आगामी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नेमबाजी स्पर्धांमध्ये यशाची मोठी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कौशल्य आधारीत शिक्षणातून स्वत:चा उद्योग सुरु करा : डॉ.प्रशांत बोडके



**राहुरी : हॅलो प्रभात**

कृषि तंत्र शिक्षण हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एक चांगली संधी आहे. आपल्या देशात आणि राज्यात शेती हा व्यवसाय बहुसंख्येने केला जातो. विद्यार्थ्यांनी अशा प्रकारचे शिक्षण घेऊन कौशल्य आत्मसात केल्यास त्यांना शेती आणि शेती संलग्न व्यवसायातून उत्तम अर्थप्राप्ती होऊ शकेल. असे मत डॉ. प्रशांत बोडके यांनी व्यक्त केले

शेती व्यवसायात तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास स्वतःचा शेती निगडीत व्यवसाय स्थापन करुन शेती उत्पादनात व उत्पन्नात निश्चितच वाढ होते. या कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांना येथील कौशल्य आधारीत शिक्षणातून स्वतःचा उद्योग सुरु करणे शक्य असल्याचे बोडके यांनी सांगितले.अहिल्यानगर जिल्ह्यातील पुणतांबा येथील शासकीय कृषि तंत्र विद्यालयाला महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कृषि तंत्रज्ञान शिक्षणाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांनी नुकतीच भेट दिली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंडित खर्डे तसेच कृषि तंत्र विद्यालयाचे कर्मचारी सोमनाथ लंघे, किशोर भाकरे, दिनेश पंडित, अंबादास इंगळे व सचिन राऊत उपस्थित होते.

## गोकुळचंद विद्यालयात आषाढी एकादशी उत्साहात



**कोपरगाव : हॅलो प्रभात**

श्रीमान गोकुळचंदजी विद्यालयात आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उमाताई वहाडणे व त्यांच्या सहकारी तसेच कोपरगाव एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष कैलास ठोळे, सचिव दिलीप अजमेरे, सहसचिव सचिन अजमेरे तसेच स्थानिक स्कुल कमेटीचे चेअरमन चंद्रकांत ठोळे,डॉ.अमोल अजमेरे, आनंद ठोळे, राजेश ठोळे, संदीप अजमेरे आदि उपस्थित होते. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना त्यांनी एकादशी निमित्त शुभेच्छा दिल्या. सौ उमाताई वहाडणे यांनी आषाढी आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची माहिति सादर करुन त्यांची प्रतिमा विद्यालयास भेट दिली. मुख्याध्यापक रघुनाथ लकारे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. उपमुख्याध्यापक अनिल अमृतकर, पर्यवेक्षक बलभीम उल्हारे,दीलीप तुपसैंदर,शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यालयाचे कलाशिक्षक अतुल कोताडे, योगेश गवळे,श्री.डोळे यांनी विद्यार्थींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कुलदीप गोसावी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्या करीता पंकज जगताप,श्रीकांत डांगे,संजय बर्डे कलाशिक्षिका सौ.अजमेरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# डीकेटीईच्या टेक्स्टाईल डिप्लोमाचा उच्चांकी निकाल



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या उन्हाळी परिक्षा २०२५ मध्ये डीकेटीईच्या टेक्स्टाईल डिप्लोमाच्या तिन्ही विभागातून आरती जाधव हिला ९२.७० टक्के गुणांसह डिप्लोमा विभागात सर्वप्रथम आली आहे. संस्थेतील ८२ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये तर ११६ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे डीकेटीई संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. हे यश मिळविण्यात विद्यार्थ्यांसोबतच तज्ञ प्राध्यापकवर्ग, अभ्यासकेंद्रीत वातावरण, अद्यायवत लॅब्स आणि संस्थेच्या शिस्तबध्द शैक्षणिक धारेणांचा मोलाचा वाटा आहे.डिप्लोमा इन टेक्स्टाईल मॅन्युफॅक्चरर्स विभागातील प्रथम वर्षात– आर्यन जाधव ८४.७६ टक्के, प्रांजल मगदुम ८३.०६ टक्के, सकीब नदाफ ८१.५३ टक्के, द्वितीय वर्षात – शंतनु केस्तीकर ९१.०५ टक्के, राजवर्धन काकडे ८९.९५ टक्के, श्रेयश शिरगुप्पे ८४.२९ टक्के, तृतीय वर्षात – मोईन तांबोळी ८९.७६ टक्के, सुदर्शन मगदुम ८९.२९ टक्के, कृष्णा मगदुम ८४.६५ टक्के अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकविला. संस्थेतील डिप्लोमा इन टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी विभागात मलिकरेहान कलावंत ८७.४७ टक्के, कार्तिक बिद्रीकोठीमठ ८२.७६ टक्के, प्रकाश घटटे ८२.२९ टक्के, द्वितीय वर्षात श्रेय गजमल ८५.३५ टक्के, शुभांगी कुंभार ८३.५४ टक्के, निरज नाईक ८१.९२ टक्के, तृतीय वर्षात रोहित कुंभार ८७.४६ टक्के, प्राजक्ता माने ८७.२४ टक्के, पूर्वा काळे ८६.२७ टक्के गुणांसह अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकविला. तसेच डिप्लोमा इन फॅशन अँण्ड क्लोदिंग टेक्नॉलॉजी विभागात प्रथम वर्षात– प्रतिभा मगदुम ८५.५९ टक्के, पूजा चौधरी ८४.३५ टक्के, ईश्वरी रंगापुरे ८०.३५ टक्के, द्वितीय वर्षात– आरती जाधव ९२.७० टक्के, पूर्वा जाधव ८९.८३ टक्के, श्रेया सरबी ८५.३२ टक्के, तृतीय वर्षात– निशा शिंत्रे ८६.७३ टक्के, वेदांती माळी ८२.९१ टक्के व अमृता कांबळे ८२.५५ टक्के गुणांसह अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकविला.

यशस्वी सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी मंत्री प्रकाश आवाडे, मानद सचिव डॉ. सौ.सपना आवाडे, कार्यकारी संचालक रवी आवाडे, सर्व ट्रस्टी यांनी भावी कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांना संचालिका डॉ एल.एस.अडमुठे, डे. डायरेक्टर डॉ. यु.जे.पाटील, विभागप्रमुख प्रा.आर.के.वळसंग सर्व प्राध्यापक वर्ग यांचे मार्गदर्शन लाभले.

# कोतोलीत सज्जन पाटील यांची भरीव कामगिरी

## आ.विनय कोरेंच्या माध्यमातून एक कोटींचा निधी



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

कोतोली ग्रामपंचायत हद्दीतील दवाखाना फाटा ते ग्रामपंचायत कार्यालयापर्यंतचा रस्ता गेल्या अनेक दिवसांपासून दुरवस्थेत होता. मात्र, कोतोलीचे माजी उपसरपंच आणि व सुवर्ण बली पतसंस्थेचे चेअरमन सज्जन पाटील यांनी सत्तेच्या बाहेर असतानाही आमदार विनय कोरे यांच्या आमदार निधीतून सुमारे एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून हा रस्ता चकाचक केला आहे.या कामामुळे ग्रामस्थांतून समाधान व्यक्त होत असून, पाटील यांच्या पुढाकाराचं सर्वत्र कौतुक होत आहे. विशेष म्हणजे, आनंदी बाजार ते पॉप नाका या रस्त्यासाठी आणखी ५० लाख रुपयांचा निधी मिळवण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी दैनिक 'हॅलो प्रभात'शी बोलताना स्पष्ट केले. सज्जन पाटील यांच्या प्रयत्नांमुळे कोतोली गावात विकासकामांना नवे बळ मिळत असून, स्थानिकांनी त्यांच्या या भूमिकेचे भरभरून स्वागत केले आहे.

# 'कृष्णा'चे सभासद शेतकरी ज्ञानयाग प्रशिक्षणासाठी रवाना

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

य.मो.कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्यावतीने ३५ शेतकरी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट पुणे येथे आयोजित ऊस शेती ज्ञानयाग प्रशिक्षणामध्ये सहभागी होण्यासाठी रवाना झाले. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊसाचे प्रतिएकरी उत्पादनवाढीसाठी शेतकर्यांना वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटतर्फे दरवर्षी प्रशिक्षण दिले जाते. या शिबीरात सहभागी होण्याची संधी कारखान्याचे चेअरमन डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाने कार्यक्षेत्रातील ३५ शेतकर्यांना उपलब्ध करून दिली आहे. या पाच दिवसीय प्रशिक्षण शिबीरात राज्यातील हजारो शेतकरी सहभागी होत असतात. शिबीरात माती परीक्षण, अधिक ऊस उत्पादनासाठी खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, खोडवा व्यवस्थापन, ऊती संवर्धित रोपे, बियाणे मळा, रोग व कीड नियंत्रण व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जैविक खतांचा वापर विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत.यावेळी संचालक जितेंद्र पाटील,विलास भंडारे, बहेचे माजी उपसरपंच मनोज पाटील यांनी सहभागी होणार्या शेतकर्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी सेक्रेटरी सिद्धेश्वर शिलवंत, जनरल मॅनेजर (केन) दादासाहेब शेळके, ऊसविकास अधिकारी पंकज पाटील, एच. आर. मॅनेजर संदीप भोसले, सिनिअर सिव्हिल इंजिनिअर ,जयवंत शिंदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षल निकम, संरक्षण अधिकारी संजय नलवडे, डॉ. विजय कुंभार, सहाय्यक शेती अधिकारी अजय दुपटे, सहाय्यक ऊसविकास अधिकारी शिवाजी बाबर यांच्यासह सर्व अधिकारी, सर्कल ऑफिसर, शेती मदतनीस व कर्मचारी उपस्थित होते.

# एम.एस.एम.आर.ए.चा आज देशव्यापी संप

**सांगली : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र सेल्स अॅण्ड मेडिकल रिप्रेझेंटेटिव्हज् असोसिशन (एम.एस.एम.आर.ए.) ही सिटू व फडरेशन ऑफ मेडिकल अॅण्ड सेल्स रिप्रेझेंटेटिव्हज असोसिएशन्स् ला संलग्नीत असुन अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीचा सक्रीय घटक आहे.

देशातील जबाबदार देशभक्त नागरिकांचा अविभाज्य भाग म्हणून संयुक्त व्यासपीठाने कामगार संहितेच्या अंमलबजावणी आणि कामगार, शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या इतर न्याय्य मागण्यांविरुद्ध २० मे ऐवजी तो संप ९ जुलै २०२५ रोजी देशव्यापी संप करण्याचे पुन्हा निश्चित करण्याचा निर्णय घेतला. श्रमसंहिता अंमलात आणण्यामागची सरकारची भूमिका स्पष्ट आहे. एकदा का कामगार वर्गाची गळचेपी केली की जनतेच्या लोकशाही अधिकारांवर, सरकारच्या धोरणांविरोधात आवाज उठवण्याच्या अधिकारावर, सरकारच्या जनविरोधी पावलांवर टीका करण्याच्या अधिकारावर आणि एकूणच मूलभूत मानवी अधिकारांवर गदा आणणे सहज शक्य होईल. महाराष्ट्रात फडणवीस सरकारने महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक पारित करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. कामगार, कष्टकर्यांचे त्यांच्या रोजी, रोटीच्या प्रश्नांवरील लढे दडपण्याचेच हे कारस्थान आहे. म्हणूनच आपल्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठीचा लढा एका नवीन उंचीवर घेऊन जाण्यासाठी समस्त कामगार, कष्टकर्यांच्या विविध मागण्यांसाठी आज (९ जूलै) रोजी होणारा संप यशस्वी करावा असे आवाहन एम.एस.एम.आर.ए. च्या वतीने करण्यात आले आहे.

# सहकारी संस्था ग्रामविकासाचा कणा : सुधीर कांबळे

**विटा : हॅलो प्रभात**

शेतकऱ्यांना सक्षम व पारदर्शक सेवांसाठी प्राथमिक कृषी पतसंस्थांना बळकटी देण्यासाठी भारत सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या विविध योजनांची माहिती प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. सहकारी संस्था ग्रामविकासाचा कणा आहेत,असे प्रतिपादन सहाय्यक निबंधक यांनी केले. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातर्फे जिल्हा उपनिबंधक (सांगली) व सहाय्यक निबंधक (खानापूर, विटा) आयोजित 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष–२०२५' व सहकार मंत्रालय स्थापना दिनानिमित्त एकदिवसीय तालुका कार्यशाळा विटा सहाय्यक निबंधक तहसीलदार कार्यालय सभागृहात घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. कांबळे यांनी नवीन केंद्रीय योजना व अंमलबजावणी, त्यांचा लाभ कसा घ्यावा, डिजिटायझेशनचा वापर आणि डाटा एंट्रीचे महत्त्व, तसेच 'एक पेड माँ के नाम'उपक्रमांतर्गत सर्व सहकारी संस्थांतील प्रत्येक कर्मचाऱ्याने एक रोप लावून त्याचे संगोपन करणे, स्वयं योजनेची काटेकोर अंमलबजावणी करण्याविषयी सूचना दिल्या. रफिक आतार यांनी केंद्रीय योजनांबाबत माहिती दिली. गावपातळीवर आर्थिक समावेशनात प्राथमिक कृषी पतसंस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी संपूर्ण देशभर एकसंध सॉफ्टवेअर प्रणालीच्या माध्यमातून प्राथमिक कृषी पतसंस्था डिजिटल प्रणालीवर आणण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. यावेळी सहकार अधिकारी उल्हास मधाळे, जिल्हा बँकेचे तालुका विभागीय अधिकारी संपतराव शिंदे, सहाय्यक सचिव शिवाजी निकम उपस्थित होते.

# अदाणी एंटरप्रायझेसने केली एनसीडी इश्यूची घोषणा

**अहमदाबाद : वृत्तसेवा**

अदाणी ग्रुपची प्रमुख कंपनी आणि भारतातील सर्वात मोठ्या सूचीबद्ध बिझनेस इनक्यूबेटर्सपैकी एक असलेल्या अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेडने (कंपनी किंवा एईएल) आपल्या दुसऱ्या सार्वजनिक इश्यूची घोषणा केली आहे. हा इश्यू सुरक्षित, रेटेड, सूचीबद्ध, रिडीमेबल आणि नॉन–कन्व्हर्टिबल डिबेंचर्सचा आहे. कंपनी १९९३ पासून इन्फ्रास्ट्रक्चर व्यवसायात कार्यरत असून तिला या क्षेत्रात मोठा अनुभव आहे आणि कंपनीचे मार्केट कॅपिटलायझेशनही खूप मोठे आहे. एईएलचा पहिला ८०० कोटी रुपयांचा एनसीडी इश्यू, जो मागील वर्षी सप्टेंबरमध्ये लॉन्च झाला होता, तो पहिल्याच दिवशी पूर्णपणे सब्स्क्राइब झाला होता.अदाणी ग्रुपचे ग्रुप सीएफओ, जुगेशिंदर 'रॉबी' सिंग म्हणाले, एईएलद्वारे एनसीडीचा दुसरा सार्वजनिक इश्यू ही आमच्या समावेशी भांडवली बाजार वाढीची आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधा विकासात किरकोळ गुंतवणूकदारांच्या सहभागाबाबतची आमची वचनबद्धता अधिक बळकट करतो. हा इश्यू एईएलच्या पहिल्या एनसीडी इश्यूला मिळालेल्या मजबूत बाजारपेठेतील प्रतिसादानंतर आणला गेला आहे, ज्यामध्ये केवळ सहा महिन्यांत रेटिंग अपग्रेडमुळे कर्ज गुंतवणूकदारांना भांडवली वाढ मिळाली. हे अदाणी ग्रुपच्या सातत्यपूर्ण कार्यप्रदर्शनाची आणि आर्थिक स्थैर्याची साक्ष आहे.

# क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये आषाढी वारी

**कुंडल : हॅलो प्रभात**

पंढरपूर हे महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. आषाढी वारी म्हणजे भक्ती, समर्पण, साधना व वारकरी परंपरेचा शुद्ध अनुभव आहे. परंतु सर्वांनाच प्रत्यक्ष वारीला जाता येत नाही म्हणूनच या परंपरेचा विद्यार्थ्यांना अनुभव मिळावा.

या हेतूने क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूलच्या वतीने आषाढी वारी व दिंडीचे आयोजन करण्यात आले.टाळ मृदुंग पताका आणि विठ्ठल नामाच्या गजरात संपूर्ण कुंडल परिसर भक्तीमय निनादांनी दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी, वेशभूषा परिधान करून हातात तुळशी वृंदावन पताका व टाळ घेऊन वारीचा प्रसंग प्रत्यक्ष उभा केला. दरम्यान आषाढी वारीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले तसेच अभंग व भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले.

या कार्यक्रमासाठी पुणे पदवीधर मतदारसंघाचे आमदार अरुणअण्णा लाड, संस्थेचे अध्यक्ष किरणतात्या लाड, उपाध्यक्ष शरदभाऊ लाड, सीईओ रणजीतभैय्या लाड, विक्रांत भैय्या लाड, प्राचार्या रूपाली शहा, व्यवस्थापक विजय जाधव, समन्वयक संदीप जाधव, व्हीजीएल अॅक्डमीचे समन्वयक रोहन पवार यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली राजमाने यांनी केले व आभार ज्योती लाड यांनी मानले.

# 'नीट' मध्ये संजय घोडावत अकॅडमीची चमकदार कामगिरी



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

संजय घोडावत आयआयटी न्ड मेडिकल कॅडमी (एसजीआयएमए) च्या विद्यार्थ्यांनी नीट २०२५ मध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. ज्यामुळे शैक्षणिक उत्कृष्टता आणि स्पर्धात्मक परीक्षेच्या तयारीसाठी कॅडमीची वचनबध्दता पुन्हा अधोरेखित झाली आहे. एसजीआयएमए हा संजय घोडावत युनिव्हर्सिटी (एसजीयू) चा एक भाग आहे,जो २००९ पासून सक्रीयपणे कार्यरत असलेल्या भारतातील आघाडीच्या वैविध्यपूर्ण समूहांपैकी एक असलेल्या संजय घोडावत समूहाची उच्च शिक्षण शाखा म्हणून काम करते.

संजय घोडावत आयआयटी न्ड मेडिकल कॅडमी (एसजीआयएमए) ची विद्यार्थिनी उत्कर्षा हळींगळे हिने ७२० पैकी ६३३ गुण मिळवून नीट २०२५ मध्ये ऑल इंडिया रँक १९३ आणि कॅटेगरी रँक ४५ मिळवला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे एसजीआयएमए मधील एकूण ५ विद्यार्थ्यांनी ६०० पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत आणि १०७ हून अधिक विद्यार्थ्यांनी ५०० पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. कॅडमीच्या इतर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांमध्ये सृष्टी कदम हिने ६१५ गुणांसह, ऑल इंडिया रँक ६२७,आदित्य फातले (६०६ गुण,एआयआर ९८६),श्रेया पवार (६०५ गुण, एआयआर १०३१) आणि विकास चौधरी (६०० गुण,एआयआर १३६९) यांचा समावेश आहे.

# 'संजीवनी अकॅडमी'चा एमएलबी स्पर्धेत विजय

## शैक्षणिक गुणवत्तेसह क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर





**कोपरगांव : हॅलो प्रभात**

दरवर्षी भारतामध्ये अमेरिकेच्या वतीने मेजर लीग बेसबॉल (एमएलबी) ही स्पर्धा घेण्यात येते. भारतातील अनेक राज्य/प्रदेश या स्पर्धेत सहभाग नोंदवितात. यावर्षी संजीवनी अॅक्डमी व संजीवनी इंटरनॅशल स्कूल च्या १३ वर्षे वयोगटांतर्गत खेळाडूंनी अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करत बेंगळूर येथील द्रविड पदुकोन एक्सलंस सेंटर येथे झालेल्या एमएलबी इंडिया कप २०२५ च्या राष्ट्रीय स्पर्धेत विजेते पद पटकावुन संजीवनी शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच क्रीडा क्षेत्रातही अग्रेसर असल्याचे सिध्द केले, अशी माहिती संजीवनी स्कूल्सच्या वतीने संयुक्तिक पत्रकाद्वारे दिली आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत एकुण १५० हुन अधिक संघांनी सहभाग नोंदविला.

शेवटी चार संघ अंतिम फेरीत पोहचले. या चार संघातुन संजीवनीच्या खेळाडूंनी अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करत अंतिम विजेते पद जिंकुन देशात एमएलबी मध्ये अव्वल असल्याची मोहर उमटवली. यात पार्थ भाऊराव गांगुर्डे, श्रीजय निखिल बोरावके, अद्वैत अच्युत फोपसे, अर्जुन विजय वडांगळे, शाश्वत समरेंद्र कुमार, विराट अनिल पवार, संजयकुमार सरोज नाईक, गिरीराज संदीप गाडे, विराट अभय देशमुख, वीरल जयप्रकाश करवा, आराध्या योगेश परजणे, श्लोक सचिन जाधव या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. संजीवनीच्या या राष्ट्रीय यशाबद्धल संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, स्कुलच्या संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक विरूपक्ष रेड्डी व मुस्तकीम पिरजादे यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ. मनाली कोल्हे यांनी संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या सहभागी खेळाडूंचा सत्कार केला. यावेळी प्रिन्सिपल डायरेक्टर सुधा सुब्रमण्यम, प्राचार्या रीना रजपुत, हेडमिस्ट्रेस रेखा साळूंके उपस्थित होते.

# आधार कार्ड सेवा केंद्र तातडीने सुरू करावी



**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

येथील इस्लामपूर तहसिलदार कार्यालयातील आधार कार्ड सेवाकेंद्र तातडीने सुरू करून इस्लामपूर व तालुक्यातील नागरिकांची गैर सोय थांबवावी,अशी मागणी इस्लामपूर शहर युवक राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने करण्यात आली. निवासी नायब तहसिलदार श्रीमती प्रज्ञा कांबळे–इंगळे यांना शहर सरचिटणीस अभिजित रासकर यांच्या हस्ते मागणीचे निवेदन देण्यात आले.इस्लामपूर तहसिलदार कार्यालयात आधार कार्ड सेवा केंद्र आहे. या केंद्रातून आधार कार्ड बाबतच्या सर्व सेवा दिल्या जातात. मात्र काही दिवसांपासून हे सेवा केंद्र बंद आहे. त्यामुळे इस्लामपूर शहर व वाळवा तालुक्यातील नागरिकांची गैरसोय होत आहे. तरी आपण लक्ष घालून हे सेवा केंद्र तातडीने सुरू करावे,असे निवेदनात म्हंटले आहे. याप्रसंगी युवक शहराध्यक्ष दिग्विजय पाटील, उपाध्यक्ष अभिजित कुर्लेकर,सोशल मिडिया शहराध्यक्ष अभिमन्यू क्षिरसागर, विकास चव्हाण, सागर पोतदार,राजेंद्र कुपकर्णी,अजय खवळे, अमित साळुंखे, प्रशांत यमगर,आकाश पाटील,शिवाजी कदम, अनुज दाभाडे,आकाश खवळे,अतिक मणेर प्रामुख्याने उपस्थित होते.

# निसर्गसंपन्न कोकणात मोबाईल नेटवर्कची कमतरता

## मोबाईल कंपन्यांचा सकारात्मक प्रतिसाद : स्थानिक पातळीवर उदासीनता



**पुणे : हॅलो प्रभात**

नुकत्याच सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार मोबाईल ही चैनीची बाब नसून अत्यावश्यक सेवा असल्याचे म्हटले आहे . मोबाईल सेवेने आज आपले संपूर्ण विश्व व्यापले असताना निसर्ग संपन्नता आणि मनमोहक समुद्र किनाऱ्यांची मुक्त उधळण असलेले परशुरामभूमी कोकण मात्र अजूनही मोबाईल सेवेच्या बाबतीत मागासलेले आहे . अनेक ठिकाणी नेटवर्क नसल्याने स्थानिकांची अतिशय गैरसोय होते . आज काल सर्व सेवा ऑनलाईन झाल्या आहेत , पंतप्रधान मोदींनी डिजिटल इंडियाचा नारा देऊनही कोकणात मात्र याच्या विपरीत परिस्थिती आहे . डिजिटल पेमेंट, ऑनलाईन सुविधा , अथवा विद्यार्थ्यांना करावा लागलेला ऑनलाईन अभ्यास असो कोकणवासीयांच्या नशिबी मात्र नेटवर्कच्या शोधात भटकण्याची वेळ आली आहे.मोबाईल कंपन्या नेटवर्क पुरविण्यास तयार आहेत बऱ्याच मोबाईल कंपन्यांनी सर्वेक्षण करून मोबाईल टॉवर साठी जागा सुद्धा निश्चित केल्या आहेत परंतु मोबाईल टॉवर उभारण्यासाठी लागणाऱ्या परवानग्यांना मात्र केराची टोपली दाखवली जाते . बऱ्याच वेळा टॉवर साठी स्थानिकांचा देखील विरोध असतो . मोबाईल नेटवर्क हवे मात्र टॉवर नको अशी काहीशी विचित्र परिस्थिती कोकणात आहे.निसर्गसंपन्न कोकणात पावसाचे काही महिने वगळता वर्षभर पर्यटकांचा राबता असतो . पर्यटन हा कोकणाचा कणा असूनही मोबाईल सेवेबाबत प्रशासन स्थानिक आणि लोकप्रतिनिधी यांच्याकडून उदासीनता दिसून येते . दैनंदिन व्यवहारामध्ये मोबाईल सेवा ही अत्यावश्यक सेवा झाली असताना एका अतिशय महत्वाच्या मुद्द्याकडे मात्र दुर्लक्ष केले जाते . कोकणात पावसाचे प्रमाण जास्त असल्याने तसेच कठीण भौगोलिक परिस्थितीमध्ये काही आपत्कालीन घटना घडल्यास संपर्क कसा करता येईल याचा कुणी गांभीर्याने विचार करत नाही. उदाहरणा दाखल रत्नागिरी मधील चाकले , मालवण, देवरुख आंबव रोड , देवरुख , खेडशी या ठिकाणी नेटवर्क ची समस्या आहे . स्थानिक पातळीवर येथे मोबाईल टॉवर ला विरोध दिसून येतो .

मोबाईल कंपन्यांशी बोललो असता असे लक्षात आले की मोबाईल कंपन्या सर्व आव्हानांवर मात करून मोबाईल सेवा पुरविण्यास तयार आहेत मात्र स्थानिक प्रशासन आणि लोकसहभागाची वानवा असल्याने इच्छा असूनही मोबाईल कंपन्या हतबल आहेत . वरिष्ठ लोकप्रतिनिधींकडे वारंवार पाठपुरावा करूनही हाती काहीच लागत नसल्याचे मोबाईल कंपन्यांचे म्हणणे आहे.